"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्यास मुदतवाढ देण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास विभाग.

**शासन परिपत्रक क्रमांक- मबावि २०२५/प्र.क्र.१६७/कार्या-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १८ नोव्हेंबर, २०२५.

संदर्भ:-

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२, दि.२८.०६.२०२४. दि.०३.०७.२०२४. दि.१२.०७.२०२४.

२) महिला व बाल विकास विभाग, शासन अधिसूचना क्र. मबावि २०२४/प्र.क्र.१५३/कार्या-२, दि.०१.०८.२०२४.

३) महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- मबावि २०२५/प्र.क्र.१६७/कार्या-२, दि. १८.०९.२०२५.

प्रस्तावना :-

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेला थेट लाभ हस्तांतरणाव्दारे (Direct Benefit Transfer) आर्थिक लाभाची रक्कम जमा करण्यात येत आहे.

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्याकरिता e-KYC प्रक्रिया करण्यास दि. १८.११.२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, राज्यातील काही जिल्हयात ओढवलेली नैसर्गिक आपत्ती तसेच या योजनेच्या पात्र लाभार्थ्यांकडे त्यांच्या पती किंवा वडीलांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांचे आधार क्रमांकावर OTP प्राप्त होण्यास निर्माण झालेली अडचण व या योजनेंतर्गत अनेक

लाभार्थी महिलांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याचे निदर्शनास आल्याने "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्याकरिता पर्यंत e-KYC प्रक्रिया करण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्याकरिता दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. या योजनेंतर्गत ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील हयात नाहीत किंवा पती देखील हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे त्या लाभार्थी महिलांनी स्वत:चे e-KYC करावे व तद्नंतर त्यांनी त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा.न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविका यांच्याकडे दि.३१.१२.२०२५ पर्यंत जमा करण्यात यावी.

३. अंगणवाडी सेविकांनी त्यांचेकडे लाभार्थी महिलांकडून दाखल केलेल्या प्रमाणपत्राची तपासणी करुन त्या लाभार्थी महिलांना त्यांचे पती अथवा वडील यांची e-KYC करण्यापासून सूट देण्यास पात्र असल्याची शिफारस बाल विकास प्रकल्प अधिकारी (CDPO) यांचे मार्फत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे दाखल करावी. तद्नंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी आयुक्त,महिला व बाल विकास यांच्यामार्फत शासनास याबाबतची शिफारस करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५१११८१६४९३३८०३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASAD
VINAYAKRAO
KULKARNI

Digitally signed by PRASAD VINAYAKRAO KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=7D19730DDF785210D50C28934B75E9B7B4F5D06B6181CF1901CE3E48EC9E3985, cn=PRASAD VINAYAKRAO KULKARNI
Date: 2025.11.18 17:09:16 +05'30'

(प्र. वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६) मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,
१०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) विभागीय आयुक्त (सर्व),
१३) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१४) जिल्हाधिकारी (सर्व),
१५) महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१६) महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९) सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) सर्व सह आयुक्त/उप आयुक्त/विभागीय उपआयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
२१) सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
२२) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत),
२३) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने),
२४) निवड नस्ती, कार्यासन-२